पुण्य नगरी
कोल्हापूर। गुरुवार, ५ डिसेंबर २०२४

# मानवी जीवन समृद्धीसाठी रोगमुक्त असावे

## सुरेखा जाधव : विवेकानंद कॉलेजमध्ये एड्स दिन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवी जीवन संपन्न आणि समृद्ध बनवण्यासाठी रोगमुक्त असले पाहिजे. २१ व्या शतकाच्या मध्यापासून संपूर्ण मानव जातीस शाप ठरलेला एचआयव्ही हा जीव घेणारा संसर्गित होणारा रोग विकसनशील आणि मागास देशांमध्ये मानवी आरोग्यास आवाहन ठरत आहे, असे मत एचआयव्ही एड्स नियंत्रण विभागाच्या समुपदेशक सुरेखा जाधव यांनी मांडले.

जाधव यांनी एचआयव्ही एड्स संक्रमणाचे मार्ग आणि घ्यावयाची खबरदारी याविषयी माहिती दिली. तसेच युवकांनी आजच्या घडीला या रोगाविषयी सविस्तर माहिती घेऊन त्याविषयी जागरूक व्हावे आणि समाजामध्ये एचआयव्ही संक्रमित व्यक्तींना दिलासा देऊन त्यांना सकारात्मक जीवन जगण्यासाठी सहाय्य करावे, असे आवाहन केले.

यावेळी एचआयव्ही एड्स रोगमुक्त भयमुक्त आणि जागरूक होण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन आयक्यूएसी, एनसीसी आणि एनएसएस विभाग यांच्यामार्फत करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रबंधक रघुनाथ जोग, मेजर सुनीता भोसले, प्रा. संदीप पाटील, प्रा. पी. आर. बागडी, प्रा. अभिजित पाटील, प्रा. एल. एस. नाकाडी, प्रा. किशोर गुजर, डॉ. विकास जाधव उपस्थित होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला. प्रास्ताविक लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा यांनी केले, तर आभार प्रा. एम. आर. नवले यांनी मानले.

पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, ६ डिसेंबर २०२४

# जीवन संपन्न, समृद्ध बनविण्यासाठी रोगमुक्त असले पाहिजे : जाधव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवी जीवन संपन्न व समृद्ध बनविण्यासाठी रोगमुक्त असले पाहिजे. २१व्या शतकाच्या मध्यापासून संपूर्ण मानव जातीस शाप ठरलेला एचआयव्ही हा जीवघेणा संसर्गित रोग विकसनशील आणि मागास देशांमध्ये मानवी आरोग्यास आव्हान ठरत आहे, असे प्रतिपादन एड्स नियंत्रण विभागाच्या समुपदेशक सुरेखा जाधव यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयात एड्स निर्मूलन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. याप्रसंगी एच. आय. व्ही. एड्स रोगमुक्त भयमुक्त व जागरूक होण्यासाठी शपथ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन आक्यूएसी एनसीसी व एनएसएस यांच्यामार्फत करण्यात आले. यावेळी प्रबंधक रघुनाथ जोग, कॅप्टन सुनीता भोसले, प्रा. संदीप पाटील, प्रा. किशोर गुजर उपस्थित होते. लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा यांनी स्वागत केले. प्रा. एल. एस. नाकाडी यांनी आभार मानले.

06/12/2024

6.12.24

तरुण भारत ६ डिसेंबर २०२५

# विवेकानंद कॉलेजमध्ये 'शैक्षणिक यात्रा' उत्साहात

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या प्रांगणात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनात शैक्षणिक यात्रा कार्यक्रम उत्साहात पार पडला. पर्यावरणपुरक उत्पादन आणि निर्मिती, दिव्यांग गुणवत्ता गौरव, आनंददायी खेळ आणि विविध सांस्कृतिक गुणदर्शनामुळे परिसर झळाळून निघाला. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते विवेकानंद कॉलेजमध्ये शैक्षणिक यात्रा २०२४ चे उद्घाटन झाले.

प्राचार्य डॉ. कुंभार म्हणाले, विवेकानंदांनी केलेली व्याख्या शिक्षण म्हणजे माणसांमध्ये असलेल्या पूर्णत्वाचे प्रकटीकरण होय. आपल्या पारंपरिक लोककला, लोकविद्या, लोकसंगीत, आपली शिल्पकला, पारंपरिक उद्योग, व्यवसायासोबत आधुनिक संगणक नैपुण्य प्राप्त करण्यासाठी विवेकानंद कॉलेजने कला, संगीत, समाजसेवा, खेळ, साहित्य, जीवन कौशल्य वाढीसाठी सातत्यपूर्ण विविध व्यासपीठे उभी केली आहेत.

विवेकानंद कॉलेजमधील दिव्यांग विद्यार्थ्यांना नारीशक्तीच्या प्रमुख ॲड. नुसरत मुजावर यांच्यावतीने दिव्यांग दिनी मदत करण्यात आली.

डॉ. नुसरत मुजावर म्हणाल्या, मी विवेकानंद कॉलेजची विद्यार्थिनी म्हणून मला नेहमी अभिमान वाटतो. आज मोबाईल, इंटरनेटसह सर्वच क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहे. आपले विवेकानंद कॉलेजही आधुनिकतेची कास धरत बदलत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील ज्ञानकेंद्रांचे ते नेतृत्व करीत आहे. हे आम्हा माजी विद्यार्थ्यांना गौरवशाली वाटत असल्याचे तिने सांगितले.

प्रा. शिल्पा भोसले यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ज्ञान आणि विज्ञानाने सुसंस्कारीत समाज निर्मिती हे शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे स्वप्न होते. विवेकानंद कॉलेजने शैक्षणिक ज्ञानासोबत सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जागृती विद्यार्थ्यांच्या अंतरंगात पेरण्याचे काम केले आहे. शैक्षणिक यात्रा या उपक्रमाला विद्यार्थी उदंड प्रतिसाद देत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला.

प्रा. एस. पी. वेदांते आणि प्रा. माधवी देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विश्वंभर कुलकर्णी यानी आभार मानले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे सहकार्य लाभले. याप्रसंगी कार्यकर्ते, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, पालक उपस्थित होते. दोन दिवस शैक्षणिक यात्रा उपक्रम राबवण्यात आला.

6/12/2024

6.12.24

पुण्य नगरी 6 डिसेंबर 2024.



# 'विवेकानंद' कुशल मनुष्यबळ घडवणारे महाविद्यालय : कुंभार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद कॉलेज अधिकारप्रदत्त स्वायत्त महाविद्यालय हे विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून कुशल मनुष्यबळ घडवणारे, सामाजिक आणि भावनिक कौशल्य जपणारे लोकप्रिय महाविद्यालय ठरले आहे, असे मत विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले. येथील विवेकानंद कॉलेज आयोजित शैक्षणिक यात्रा २०२४ च्या उद्घाटन समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनात आयोजित दोनदिवसीय शैक्षणिक यात्रा हा कार्यक्रम उत्साहात झाला. पर्यावरणपूरक उत्पादन आणि निर्मिती, दिव्यांग गुणवत्ता गौरव, आनंददायी खेळ आणि विविध सांस्कृतिक गुणदर्शन यामुळे विद्यार्थ्यांनी हा परिसर वेगळ्या अनुभवाने झळाळून निघाला गेला.

दिव्यांग विद्यार्थ्यांना नारीशक्तीच्या प्रमुख ॲड. नुसरत मुजावर यांच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली. स्वागत प्रा. शिल्पा भोसले यांनी केले. प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी आभार मानले. प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. माधवी देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे सहकार्य लाभले.

06/12/2024

06/12/2024

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, ७ डिसेंबर २०२४

**विवेकानंद महाविद्यालय**

विवेकानंद महाविद्यालयात प्रा. डॉ. ई. बी. आळवेकर यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. इतिहास विभागप्रमुख डॉ. सिद्धार्थ कट्टीमनी यांनी मनोगत व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. ए. बी. वसेकर यांनी स्वागत केले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी आभार मानले. यावेळी आयक्यूएसी प्रमुख डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार आर. बी. जोग, डॉ. कैलास पाटील, डॉ. बी. टी. दांगट, प्रा. एम. आर. नवले, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. जे. आर. भरमगोंडा, प्रा. एस. एम. भोसले उपस्थित होते.

सकाळ TODAY
कोल्हापूर, शनिवार, ७ डिसेंबर २०२४
६

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन

## विवेकानंद कॉलेज

प्रा. डॉ. ई. बी. आळवेकर यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. प्रा. ए. बी. वसेकर यांनी प्रास्ताविक केले. इतिहास विभागप्रमुख डॉ. सिद्धार्थ कट्टीमनी म्हणाले, "डॉ. आंबेडकर यांनी वंचित, शोषित लोकांच्या प्रगतीसाठी भारतीय राज्यघटना लिहिली. त्यामुळेच स्वातंत्र्य, समता व बंधूता तत्त्वांचा अंगीकार करून समाजाची प्रगती होत आहे.'' प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन केले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी आभार मानले. आय.क्यु.ए.सी. प्रमुख डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार आर. बी. जोग, डॉ. कैलास पाटील, डॉ. बी. टी. दांगट, प्रा. एम. आर. नवले, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. जे. आर. भरमगोंडा, प्रा. सौ. एस. एम. भोसले, ज्युनिअर, सीनिअर कॉलेजमधील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, एन.सी.सी. कॅडेट उपस्थित होते.

तरुण भारत संवाद

रविवार, ८ डिसेंबर २०२४

# किणीच्या सृष्टी चाळकेची ठाणे जिल्हा न्यायालयात कनिष्ठ सहाय्यकपदी निवड



**घुणकी :** किणी (ता हातकणंगले) येथील सृष्टी संजय चाळके हिची ठाणे जिल्हा व सत्र न्यायालय येथे कनिष्ठ सहाय्यकपदी निवड झाली आहे. सृष्टीचे कन्या विद्यामंदिर,किणी, माध्यमिक शिक्षण किणी हायस्कूल,व विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगांव, उच्च माध्यमिक शिक्षण विवेकानंद महाविद्यालय,कोल्हापूर व आण्णासाहेब डांगे महाविद्यालय आष्टा येथून शिक्षण पूर्ण करून सेट परिक्षा उत्तीर्ण झाली आहे. सृष्टीला आई वडीलांसह कुटूंबाचे प्रोत्साहन लाभले.

पुढारी | रविवार, ८ डिसेंबर २०२४

09/12/2024

# 'विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून कुशल मनुष्यबळ घडविणारे शिक्षण महत्त्वाचे'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दर्जेदार शिक्षण हे केवळ जीवन बदलणारे नाही, तर मनाला कलाटणी देणारा व चारित्र्य घडवणारा अनुभव देते. विद्यार्थ्यांची गुणवत्ता ओळखून कुशल मनुष्यबळ घडविणारे शिक्षण महत्त्वाचे आहे, असे मत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेज आयोजित शैक्षणिक यात्रा-२०२४ उद्घाटनप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. ॲड. नुसरत मुजावर यांनी दिव्यांग दिनाचे औचित्य साधत आर्थिक मदत केली. प्रा. शिल्पा भोसले यांनी स्वागत केले. प्रा. एस. पी. वेदांते, प्रा. माधवी देशपांडे, प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

9.12

सकाळ

बुधवार, ११ डिसेंबर २०२४



**कोल्हापूर :** मुंबई येथील 'डायलॉग्ज मीडिया' या कंपनीमध्ये प्लेसमेंट मिळवलेले विवेकानंद महाविद्यालयाचे बी. व्होक. ॲनिमेशन अँड फिल्म् मेकिंग पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी.

# विवेकानंद महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर, ता. १० : येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या बी. व्होक. ॲनिमेशन अँड फिल्म मेकिंग पदवी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या पाच विद्यार्थ्यांची मुंबईच्या 'डायलॉग्ज मीडिया' या कंपनीमध्ये स्क्रीप्ट रायटिंग व सिनेमॅटोग्राफी या पदासाठी निवड झाली. या विद्यार्थ्यांना पाच लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज जाहीर झाले आहे. दिग्विजय पाटील, कामया खातीब, संहिता मोरे, ऋचा बराडे व सुमित इंगळे यांना नोकरी मिळाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांना बी. व्होक. विभागाच्या नोडल ऑफिसर डॉ. श्रुती जोशी व विभागप्रमुख प्रा. महेश माळी, प्रा. निखिल शिंगे, प्रा.अतुल पाटील, प्रा. अनिकेत कोरे, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ
बुधवार, ११ डिसेंबर २०२४

# कॉपीमुक्त दहावी, बारावीच्या परीक्षेसाठी शाळांची पूर्वतयारी

## कोल्हापूर विभागीय मंडळाची मंगळवारी सभा

कोल्हापूर, ता. १० : दहावी, बारावी परीक्षेतील गुणवत्ता वाढविणे आणि परीक्षा कॉपीमुक्त मुक्त करण्याच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर विभागीय मंडळाने सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यांत दोन टप्प्यांत शाळाप्रमुखांच्या बैठकांचे आयोजन केले आहे. विवेकानंद महाविद्यालयात १७ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या सभेवेळी पूर्वतयारी करून जिल्ह्यातील मुख्याध्यापक, प्राचार्यांना उपस्थित राहण्याच्या सूचना विभागीय मंडळाने दिल्या आहे.

शाळेच्या परीक्षेच्या अनुषंगाने प्रशासकीय, शैक्षणिक, तांत्रिक माहिती मुख्याध्यापक सभेसाठी विभागीय मंडळाचे सचिव सुभाष चौगुले यांनी मागवली आहे. या मंडळातर्फे १७ डिसेंबर रोजी सकाळच्या सत्रात आजरा, भुदरगड, चंदगड, गडहिंग्लज, गगनबावडा, हातकणंगले, कागल आणि दुपारच्या सत्रात करवीर, कोल्हापूर शहर, पन्हाळा, राधानगरी, शाहूवाडी, शिरोळ या तालुक्यांची सहविचार सभा कोल्हापुरात होणार आहे. बोर्ड परीक्षेची सर्वंकष माहिती होण्यासह आगामी परीक्षेची आवश्यक पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने विभागातील प्रत्येक जिल्ह्यात दोन टप्प्यांत बैठकांचे आयोजन केले असल्याची माहिती मंडळाचे विभागीय अध्यक्ष राजेश क्षीरसागर यांनी दिली.

**शाळाप्रमुखांसाठी हे महत्त्वाचे ...**

'शाळा परिसर व वर्गातील सीसीटीव्ही, दिव्यांग विद्यार्थी, नोंदणी व शिक्षण संक्रमण मासिक, चालू वर्षीच्या परीक्षार्थी संख्येत झालेली वाढ किंवा घट, राज्य मंडळ व विभागीय मंडळ संकेतस्थळाचा वापर, मंडळाच्या मोबाईल ॲपचा विद्यार्थी व शिक्षकांकडून वापर, मागील वर्षाच्या निकालाची टप्पेनिहाय माहिती, उल्हास साक्षरता कार्यक्रमातील शाळेचा सहभाग, स्कूल प्रोफाइल, परीक्षक-नियामक, योग्यता व पात्रता प्रमाणपत्र, प्रात्यक्षिक परीक्षेची पूर्वतयारी, शास्त्रीय व लोककला संस्था, खेळाडू एनसीसी स्काऊट गाईडमधील वाढीव गुण, आदींबाबतची शाळाप्रमुखांनी पूर्वतयारी करून माहितीसह उपस्थित राहावे', असे आवाहन क्षीरसागर यांनी केले आहे.

12/12/2024

12/12/24

पुण्य नगरी
कोल्हापूर। गुरुवार, १२ डिसेंबर २०२४

# कोल्हापुरात विभागीय मंडळाची १७ रोजी सभा

**कोल्हापूर :** दहावी व बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवत्ता वाढवणे आणि परीक्षा कॉपीमुक्त व गैरप्रकार मुक्त करण्याच्या पार्श्वभूमीवर कोल्हापूर विभागीय मंडळाने तिन्ही जिल्ह्यांत दोन टप्प्यात शाळाप्रमुखांच्या बैठकांचे आयोजन केले आहे. विवेकानंद महाविद्यालयात मंगळवार दि. १७ डिसेंबर रोजी सभेवेळी पूर्वतयारी करूनच प्राचार्यांना उपस्थित राहण्याच्या सूचना मंडळाकडून दिल्या. सातान्यात ११ व सांगलीत १२ डिसेंबर रोजी सभा आहे.

12/12/2024

12/12/2024

दै. सकाळ - 14/12/2024.



मुरगूड : आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झालेला विद्यापीठाचा व्हॉलीबॉल संघ.

# आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी व्हॉलीबॉल संघाची निवड

मुरगूड, ता. १३ : शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व्हॉलीबॉल संघाची निवड झाली असून, हा संघ १४ ते १८ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी होणार आहे. स्पर्धा स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे होत आहेत. स्पर्धेसाठी संघासोबत प्रशिक्षक संदीप पाटील, सहायक प्रशिक्षक तथा व्यवस्थापक डॉ. सुनील चव्हाण जाणार आहेत.

संघातील खेळाडू असे : ओंकार लोकरे, विवेक चौगले, सत्यजित शिंदे (मंडलिक महाविद्यालय मुरगूड), विजय खामकर, कृपेश पाटील (दूधसाखर महाविद्यालय, बिद्री), अथर्व तोडकर, विजय पाटील (डी. आर. माने महाविद्यालय, कागल), सौरभ जगदाळे, धीरज पाटील (एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड), विश्वरूप पाटील, आदित्य सदामते (केबीपी कॉलेज, इस्लामपूर), अभिजित कांबळे (अण्णासाहेब डांगे महाविद्यालय, हातकणंगले), अमन नायकवडे (देवचंद कॉलेज, अर्जुननगर), ऋषिकेश ठमके (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर)

14/12/2024

14/12/2024

पुण्य नगरी
बुधवार, १८ डिसेंबर २०२४

# सैनिकांच्या त्यागामुळे भारत महासत्ता

## कर्नल देशपांडे : 'विवेकानंद'मध्ये १९७१ च्या युद्धसैनिकांचा सन्मान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशाचे ऐक्य आणि अखंडता टिकवण्यासाठी भारतीय स्थलसेना, नौसेना आणि वायू दलाच्या सैनिकांनी आणि अधिकाऱ्यांनी अतुल्य पराक्रम केला. त्यामुळे आज आपण संपूर्ण विश्वात सुरक्षित नागरिक आणि महासत्ता म्हणून उदयास आलो आहोत, असे प्रतिपादन कर्नल देशपांडे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्रा. संजय थोरात होते.

विवेकानंद महाविद्यालयात भारत-पाकिस्तान १९७१ युद्धाच्या स्मृतिदिनानिमित्त साजरा केलेल्या विजय दिनानिमित्त माजी सैनिक सन्मान सोहळा आयोजित केला होता. या कार्यक्रमात १९६२, १९६५, १९७१ च्या युद्धातील आणि त्यानंतरच्या युद्धजन्य स्थितीतील अतुलनीय कामगिरी बजावणाऱ्या भारतीय सैनिकांचा गौरव करण्यात आला. हा कार्यक्रम सैनिक कल्याण फेडरेशन आणि आयक्यूएसी सेलतर्फे आयोजित केला. यावेळी जिल्ह्यातील २५० युद्धसैनिक उपस्थित होते.



कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात भारत-पाकिस्तान युद्धाच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात माजी सैनिक व एनसीसी कॅडेट.

युद्धजन्य परिस्थितीत साहसी वृत्तीने पराक्रम बजावणाऱ्या कर्नल विजय गायकवाड, कॅप्टन एन. एन. पाटील, कॉर्पोरेल एम.डी. देसाई, सीपीओ पठाडे, सीईपी पृथ्वीराज देसाई, कॅप्टन चव्हाण, कॅप्टन कांबळे यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, स्वागत बी. टी. पाटील, सूत्रसंचालन प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी केले.

आभार मेजर सुनीता भोसले यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी, कर्नल मानस दीक्षित, कर्नल संधान मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली केले गेले. कार्यक्रमास शहाजी कॉलेज, न्यू कॉलेज, छत्रपती शाहू कॉलेज, महावीर कॉलेज, कमला कॉलेज, कॉमर्स कॉलेज येथील एनसीसी विद्यार्थी उपस्थित होते.

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द मराठी दैनिक ग्लोबल टाइम्स

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Web Site : www.theglobaltime.com ■ Register No. RNI - MAHMAR /2012/44621

▸ वर्ष - १२ ▸ अंक - ३३८ ▸ गुरुवार दि. १९ डिसेंबर २०२४ ▸ मुंबई ▸ पाने - ०८ ▸ किंमत - ₹३

# विवेकानंदच्या विद्यार्थिनींचा साहसी उपक्रमात सहभाग

कोल्हापूर : येथील विवेकानंद महाविद्यालयतर्फे महाविद्यालयातील विद्यार्थिनी व स्टाफसाठी निसर्गाच्या सानिध्यातील साहसी ट्रेक पळसंबे, रामलिंग व गगनबावडा येथे आयोजन करण्यात आला होता. या ट्रेकमध्ये ३० छात्र, विद्यार्थीनी व स्टाफ सहभागी होते.

यावेळी त्यांनी के. टी. विअर धरण, रामलिंग मंदिर, दोन ज्योतिर्लिंग, कोरलेली शिल्पे इत्यादी ठिकाणी भेटी दिल्या. तसेच जैवविविधतेत नटलेल्या परिसराचा अनुभव घेतला. विविध पक्षी, जळू, दगडी फुलपाखरे, निवळी कीटक तसेच औषधी वनस्पती इत्यादी पाहावयास मिळाल्या.

याप्रसंगी गाईड राजेश गणपुले, मेजर सुनिता भोसले, डॉ. एस. एस. लट्ठे, डॉ. सोमनाथ काळे, डॉ. कैलास पाटील, डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी मार्गदर्शन केले. या ट्रेकच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच आयक्युएसी विभाग प्रमुख डॉ. श्रुती जोशी, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रबंधक रघनाथ जोग यांचे सहकार्य लाभले.

पुढारी

शुक्रवार, २० डिसेंबर २०२४

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थिनी साहसी उपक्रमात सहभागी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थिनीं व स्टाफसाठी निसर्गाच्या सान्निध्यातील साहसी ट्रेकचे पळसंबे, रामलिंग, गगनबावडा येथे आयोजन करण्यात आले होते. यात ३० छात्र विद्यार्थिनी व स्टाफ सहभागी झाले. राजेश गणपुले, मेजर सुनीता भोसले, डॉ. एस.एस.लट्ठे, डॉ. सोमनाथ काळे, डॉ. कैलास पाटील, डॉ. एस. एस. अंकुशराव यांनी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ . आर. आर. कुंभार यांचे प्रोत्साहन लाभले. डॉ. श्रुती जोशी, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, रघुनाथ जोग यांचे सहकार्य लाभले.

लोकमत
शुक्रवार २०.१२.२०२४

# ट्रेन द ट्रेनर्स शिबिर उत्साहात

कोल्हापूर : स्वामी विवेकानंद कॉलेजमध्ये चेस असोसिएशन कोल्हापूरने आयोजित केलेला ट्रेन द ट्रेनर्स शिबिर उत्साहात झाले. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना शाळेत बुद्धिबळ हा उपक्रम येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू होत आहे. त्यासाठी आठ जिल्ह्यात शिबिर होत आहे. पैकी विवेकानंद कॉलेजमध्ये शिबिर घेतले. महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे उपाध्यक्ष गिरीश चितळे, डॉ. शरद बनसोडे, सिद्धांत शिंदे, कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते बुद्धिबळाच्या चुंबकीय प्रदर्शन पटावर चाल करून कार्यशाळेचे उद्घाटन झाले. डॉ. विकास जाधव, संतोष कुंडले, भरत चौगुले, मनीष मारुलकर, उत्कर्ष लोमटे, उपाध्यक्ष धीरज वैद्य, राष्ट्रीय पंच आरती मोदी उपस्थित होते.

पुण्य नगरी

रविवार, २२ डिसेंबर २०२४

# 'विवेकानंद'मध्ये मंगळवारी शिष्यवृत्ती वितरण

**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती केली म्हणूनच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाप्रमाणे विवेकानंद कॉलेजने 'शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती' सुरू केली आहे. हा शिष्यवृत्ती वितरण समारंभ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे मंगळवार, दि. २४ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे.

याचा प्रारंभ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून करण्यात येत आहे. यामध्ये महाविद्यालयातील इयत्ता अकरावी, बारावी, पदवी व पदव्युतर स्तरावरील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या समारंभाचे प्रमुख पाहुणे कवी अरुण म्हात्रे असून, अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे उपस्थित राहणार आहेत. संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांची प्रमुख उपस्थिती आहे.

23/12/2024

सकाळ
रविवार, २२ डिसेंबर २०२४

# 'आविष्कार'मध्ये १९१ प्रकल्पांचे सादरीकरण

## स्पर्धेचा दुसरा दिवस; तीन विजेत्यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आविष्कार संशोधन स्पर्धेच्या ठिकाणी सादर केलेले प्रकल्प पाहण्यासाठी विद्यार्थी-विद्यार्थिनींची झालेली गर्दी.

कोल्हापूर, ता. २१ : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या दोनदिवसीय विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सवात दुसऱ्या दिवशी पदव्युतरस्तरीय संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी संशोधन प्रकल्पांचे पोस्टर तसेच मॉडेल्सद्वारे सादरीकरण केले.

आज १९१ संशोधकांनी सहभाग नोंदविला. दरम्यान, काल झालेल्या स्पर्धेचा निकालही सायंकाळी जाहीर झाला. अनुक्रमे पहिल्या तीन विजेत्या प्रकल्पांना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात येईल. जिल्हास्तरीय महाविद्यालयीन स्पर्धेच्या फेऱ्यांनंतर आविष्कार संशोधन स्पर्धा महोत्सव राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात झाली. रसायनशास्त्र अधिविभागातर्फे महोत्सवाचे संयोजन केले. मानव्यशास्त्र गटात १७, वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा गटात १९, शुद्ध विज्ञान गटात ५६, कृषी आणि पशुसंवर्धन गटात ३८, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान गटात १८ आणि वैद्यकीय व औषधनिर्माण गटात ४४ प्रकल्पांचे सादरीकरण केले.

### स्पर्धेचा निकाल गटनिहाय अनुक्रमे :

**पदवीस्तरीय स्पर्धा:** मानव्यशास्त्र, भाषा आणि कला:- १. प्रीती भिसे (डी.के.ए.ए. महाविद्यालय, इचलकरंजी), श्रुती माने (महावीर महाविद्यालय), अवंती पाटील (जयसिंगपूर महाविद्यालय), सानिया मुजावर (विलिंग्डन महाविद्यालय), इंद्रायणी महाजन (श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली).

**वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा** : शर्वरी पिसाळ (केबीपी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च सातारा), शर्वरी गुरव (न्यू कॉलेज), सानिया सूर्यवंशी (यशवंतराव चव्हाण आर्टस् कॉलेज, उरूण इस्लामपूर), रामकृष्ण सावंत (तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी), रसिका गायकवाड (विवेकानंद महाविद्यालय).

**शुद्ध विज्ञान** : संचिता श्रीनिवास (केआयटी अभियांत्रिकी), प्रतीक्षा भुजबळ (मुधोजी कॉलेज फलटण), अनुराधा बोरनाईक (देवचंद महाविद्यालय अर्जुननगर), नुपूर काळे (विलिंग्डन कॉलेज), साक्षी शिंदे (दादासाहेब ज्योतीराम गोडसे महाविद्यालय पलूस).

**कृषी आणि पशुसंवर्धन** : विघ्नेश पाटील (न्यू कॉलेज), ताहीर मुल्ला (यशवंतराव चव्हाण सायन्स कॉलेज कऱ्हाड), रितिका कोंडुसकर (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी), जान्हवी पानसरे (राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी साखराळे), यश पाटील (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव).

**अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान** : दीक्षा घोईसावरवाडे (न्यू कॉलेज), प्राची लोकरे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव), श्रुती पाटील (कॉलेज ऑफ नॉन-कॉनव्हेशनल व्होकेशनल ऑफ कोर्स फॉर विमेन), निखिल पाटील (संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग चिंचेवाडी गडहिंग्लज), पद्मावती घाडगे (आप्पासाहेब बिरनाळे कॉलेज ऑफ फार्मसी सांगली).

**वैद्यकीय आणि औषधनिर्माण** : श्रुती किल्लेदार (भारती कॉलेज ऑफ फार्मसी), वैष्णवी सावंत (सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज कऱ्हाड), ऋषीकेश पाटील (अरविंद गवळी कॉलेज ऑफ फार्मसी सातारा), स्वप्नील माने (वासंतीदेवी पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, कोडोली), अफताब गडकरी (राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज).

**पीएचडी संशोधनस्तरीय स्पर्धा** : मानव्यशास्त्र, भाषा आणि कला : निलम कांबळे (डी. पी. भोसले कॉलेज कोरेगाव), किरण चौगुले (यशवंतराव चव्हाण कॉलेज उरूण इस्लामपूर), सुनील बुद्धनवार (बळवंत कॉलेज विटा).

**शुद्ध विज्ञान** : ऋतुजा चौगुले (भारती कॉलेज ऑफ फार्मसी), किरण माळी (गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ फार्मसी, कऱ्हाड), फरिदा इनामदार (कस्तुरबाई वालचंद कॉलेज सांगली), पूजा देशमुख (गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ फार्मसी कऱ्हाड), अनिकेत भोसले (लालबहादूर शास्त्री कॉलेज सातारा).

**कृषी आणि पशुसंवर्धन** : रोहन वखारिया (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव), मनिषा मुरगुडे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव), ललिता दहिवडे (भारती कॉलेज ऑफ फार्मसी), प्रतीक्षा डोंगरे (जीवरसायनशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ), सुनीता शिंदे (तात्यासाहेब कोरे कॉलेज ऑफ फार्मसी वारणानगर).

**अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान** : आण्णासाहेब चौगुले (शिवाजी विद्यापीठ), शुभांगी शीद (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी कासेगाव), शुभम गिरीगोसावी (भूगोल अधिविभाग शिवाजी विद्यापीठ), अभिजित शेळके (लालबहादूर शास्त्री कॉलेज सातारा).

**वैद्यकीय आणि औषधनिर्माण** : निशा नेर्लेकर (जैवरसायनशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ), व्यंकटेश धरणगुतीकर (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी), नेहा देसाई (अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी पेठवडगाव), क्रांती कचरे (रसायनशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ), विद्या डांगे (राजारामबापू कॉलेज ऑफ फार्मसी).

23/12/24
23.12

पुढारी
सोमवार, २३ डिसेंबर २०२४

# 'विवेकानंद'मध्ये उद्या डॉ. बापूजी साळुंखे शिष्यवृत्ती वितरण

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद कॉलेजमध्ये शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान सोहळा मंगळवार (दि. २४) रोजी सकाळी दहा वाजता होणार आहे. महाविद्यालयातील ११ वी, १२ वी, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.

समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून कवी अरुण म्हात्रे, मुंबई उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे असणार आहेत. संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थ्यांनी समारंभास उपस्थित राहावे, असे आवाहन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले आहे.

23/12/2024

23.12.

सकाळ
मंगळवार, २४ डिसेंबर २०२४

# यिन निवडणूक पहिला टप्पा आजपासून

## शहरासह जिल्ह्यातील १७ महाविद्यालयांत होणार निवडणूक

YOUNG INSPIRATORS NETWORK
Inspire. Network. Deliver

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २३ : 'सकाळ' माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्कच्या (यिन) महाविद्यालयीन अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीचा पहिला टप्पा आजपासून (ता. २४) सुरू होत आहे. शहरासह जिल्ह्यातील १७ महाविद्यालयांत निवडणूक होणार आहे. ऑनलाईन पद्धतीने सकाळी आठ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत मतदान केले जाणार आहे. बुधवारी (ता. २५) मतमोजणी होणार असून, त्याच दिवशी सायंकाळी पाच वाजता विजयी उमेदवारांची घोषणा ॲपवर केली जाणार आहे.

निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांनी जोरदार प्रचार यंत्रणा राबविल्याने, निवडणुकीची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची माळ कोणाच्या गळ्यात पडणार, याची उत्कंठा आहे. आज मतदान प्रक्रिया होणार असून, मतदार कोणाच्या पारड्यात मते टाकणार, याचा अंदाज बांधला जात आहे. मतदारांची यादी उमेदवारांपर्यंत पोहोच झाली आहे.

विवेकानंद महाविद्यालय, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी, कॉमर्स कॉलेज, गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, डी. के. शिंदे स्कूल ऑफ सोशल वर्क, तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी कॉलेज (वारणानगर), केआयटी, डी. वाय. पाटील टेक्निकल कॅम्पस (एमबीए), भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज, भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अशोकराव माने इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्स अँन्ड रिसर्च (सावे), तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक), कॉमर्स कॉलेज (बीबीए, बीसीए, एमबीए), भारती विद्यापीठ न्यू लॉ कॉलेज (सांगली), इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल अँन्ड रुरल इंजिनिअरिंग अडल्ट (गारगोटी), इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल अँन्ड रुरल इंजिनिअरिंग अनअडल्ट (गारगोटी), कर्मवीर हिरे आर्टस्, कॉमर्स, सायन्स एज्युकेशनल कॉलेजमध्ये (गारगोटी) निवडणूक होणार आहे.

### दुसऱ्या टप्प्यांतील मतदान २७ ला

■ **दुसऱ्या टप्प्यातील मतदान २७ डिसेंबरला होणार आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत २५ डिसेंबर, माघार व मतदान नोंदणी मुदत २६ डिसेंबरला सायंकाळी पाच वाजेपर्यंत आहे. अधिक माहितीसाठी यिन सहायक व्यवस्थापक (पश्चिम महाराष्ट्र) अवधूत गायकवाड (९९७५१३१२७०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**

24/12/24

24.12.2024

पुण्य नगरी
बुधवार, २५ डिसेंबर २०२४



# 'विवेकानंद'मध्ये किसान दिन उत्साहात

**कोल्हापूर :** येथील विवेकानंद महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने हेर्ले येथील शेतामध्ये किसान दिन साजरा करण्यात आला. दरवर्षी २३ डिसेंबर हा दिवस पूर्व प्रधानमंत्री चौधरी चरणसिंह यांच्या जयंतीनिमित्ताने किसान दिन म्हणून साजरा केला जातो. या निमिताने वनस्पतीशास्त्र विभागातील बी.एस्सी. भाग-३च्या विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांची भेट घेतली, समस्या समजावून घेतल्या व सेंद्रिय शेतीचे फायदे व देशी वाणांचे संवर्धन याबद्दल माहिती दिली. याचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यासाठी वनस्पतीशास्त्र विभागातील प्रा. डॉ. अभिजित कासारकर, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

26/12/2024

26.12.24

PR
26.12.24

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २५ डिसेंबर २०२४

# विवेकानंद महाविद्यालयातर्फे किसान दिन साजरा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने हेर्ले येथे शेतात जाऊन किसान दिन साजरा करण्यात आला. याचे आयोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व विभागप्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

पुढारी

गुरुवार, २६ डिसेंबर २०२४



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरण समारंभात विद्यार्थिनीस पारितोषिक प्रदान करताना कवी अरुण म्हात्रे. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. जी. जे. नवाथे आदी. (छाया : नाज ट्रेनर)

# गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला प्रेरणा

## अरुण म्हात्रे; डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्तींचे वितरण

**कोल्हापूर :पुढारी वृत्तसेवा**

गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला प्रेरणा मिळते. ज्यांच्या घरात पुस्तकांचे कपाट आहे ते सर्वात श्रीमंत घर असते. त्यामुळे विद्यार्थीदशेत ज्ञानार्जन करावे व भविष्य सुखकारक करावे, असे प्रतिपादन कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. यावेळी वरिष्ठ प्रा. एस. पी. थोरात, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, समन्वयक डॉ. कैलास पाटील उपस्थित होते. याप्रसंगी समारंभात ११ वी, १२ वी, पदवी व पदव्युत्तर स्तरावरील गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. पाहुण्यांची ओळख प्रा. संदीप पाटील यांनी करून दिली. परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे यांनी आभार मानले. प्रा. समीक्षा फराकटे व प्रा. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

यावेळी डॉ. ए. बी. वसेकर, डॉ. बी. टी. दांगट, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. किशोर गुजर, आर. बी. जोग आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी ३

शनिवार, २८ डिसेंबर २०२४



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे शिष्यवृत्ती पुरस्काराने सृष्टी कांबळे हिला सन्मानित करताना मान्यवर.

# सृष्टी कांबळे हिला दोन पुरस्कार

**गडहिंग्लज :** येथील सृष्टी कांबळे हिने विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे विज्ञान विभागात प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल व वनस्पतीशास्त्र विषयात बी.एस्सी भाग १ व ३ या तीन वर्षंत अतिउत्कृष्ट योगदानाबद्दल बी. एन. पाटील पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार कवी करुण म्हात्रे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तसेच स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने 'शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे शिष्यवृत्ती पुरस्कार' मिळाला आहे.

तरुण भारत

शनिवार, २८ डिसेंबर २०२४

# सृष्टी कांबळे हिला दोन पुरस्कार

**गडहिंग्लज :** कोल्हापूर येथील स्वामी विवेकानंद कॉलेजमधील सृष्टी कांबळे हिला शिक्षण महर्षी बापुजी सांळुखे शिष्यवृत्ती पुरस्कार आणि २०२३-२४ या वर्षातील विज्ञान विभागातील प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल बी. एन. पाटील पुरस्कार देवून ज्येष्ठ कवी अरूण म्हात्रे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. रोख ५ हजार, प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्या शुभांगी गावडे यांच्यासह सृष्टीचे वडिल प्रकाश कांबळे, आई कल्पना कांबळे, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.



पुढारी

कोल्हापूर, शनिवार, २८ डिसेंबर २०२४

# विवेकानंद कॉलेजमध्ये राष्ट्रीय गणित दिवस साजरा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या गणित विभागातर्फे गणित शास्त्रज्ञ रामानुजन यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय गणित दिवस साजरा करण्यात आला. यानिमित्ताने महाविद्यालयात भित्तीपत्रके व प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या.

भित्तीपत्रिका स्पर्धेत हर्ष पवार, आविष्कार कांबळे, अभिजित कळके, श्रीधर जाधव, सुजाता भोगम यांनी यश संपादन केले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत हर्ष पवार, अनुष्का पवार, तृप्ती चौगुले यांनी अनुक्रमे प्रथम ते तृतीय क्रमांक पटकावला. यशस्वी विद्यार्थ्यांचा रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते सत्कार केला. कार्यक्रमाचे नियोजन गणित विभाग प्रमुख प्रा. एस. पी. थोरात, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी केले. प्रणाली मोरे, संध्या वाडीचरला, सानिका कळमकर यांनी सूत्रसंचालन केले. अर्पिता पाटीलने प्रास्ताविक, दिव्या साजणीकरने आभार मानले.

तरुण भारत
रविवार २९ डिसेंबर २०२४

# शिष्यवृत्तीतून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला प्रेरणा

## कवी प्रा. अरुण म्हात्रे यांचे प्रतिपादन : विवेकानंद कॉलेजमध्ये शिष्यवृत्ती वितरण समारंभ उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सामान्य माणसाच्या लिहित्या हातांना बळ दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मातीशी नाळ जोडून आपली संस्कृती जोपासली पाहिजे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या शैक्षणिक कार्याचा चढता आलेख महाराष्ट्राला ज्ञात आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षण क्षेत्रात क्रांती केली म्हणूनच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले. त्यामुळे गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बौध्दिक क्षमतेला प्रेरणा मिळत राहते, असे प्रतिपादन कवी अरुण म्हात्रे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते.




**कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरण सोहळयात मार्गदर्शन करताना कवी प्रा. अरुण म्हात्रे. सोबत संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, डॉ. आर. आर. कुंभार, प्रा. संदीप पाटील आदी.**

कवी म्हात्रे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे काव्यमय चरित्र लिहिणे ही माझी नैतिक जबाबदारी आहे. स्वतंत्र शिष्यवृती देणारे विवेकानंद कॉलेज हे महाराष्ट्रातील पहिले महाविद्यालय आहे. ज्यांच्या घरात पुस्तकांचे कपाट आहे ते सर्वात श्रीमंत घर असते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी याच वयात ज्ञानार्जन करावे व आपले भविष्य सुखकारक घडवावे, असे सांगितले. तसेच कवी म्हात्रे यानी मंगेश पाडगावकर, फ. मुं. शिंदे, सुरेश भट, नारायण सुर्वे, प्रदीप निफाडकर, विठ्ठल वाघ, महेश केळूसकर यांच्या कवितांसह स्वतःच्या कविता आणि गीते सुमधूर आवाजात सादर केली.

अध्यक्षस्थानावरून गावडे म्हणाले, विवेकानंद कॉलेजने कला, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात अनेक नामवंत विद्यार्थी देशसेवेसाठी दिले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची धुरा मा. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी सांभाळली आहे. त्यांच्या शाळेतच माझ्यासारख्या कित्येकांची जडणघडण झाली आहे. बापूजींचा हा वैचारिक वारसा पुढील पिढीने जोपासावा.

सागर चव्हाण, डॉ. एस. व्ही. काकतकर, डॉ. एस. आर. पाटील, प्राचार्य डी. ए. पाटील, माजी प्राचार्य कणबरकर कुटुंबीय, प्रा. माधवी चरणकर, बी. एन. पाटील, डॉ. आर. एस. पाटील, राहूल हत्ती कुटुंबीय, प्रा ए. एस. कदम यांनी महाविद्यालयात दिलेल्या ठेवीतून विद्यार्थ्यांना पारितोषिकेही दिली. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. संदीप पाटील यांनी करुन दिली. आभार परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे व प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. यावेळी प्रा. एस. पी. थोरात, परीक्षा नियंत्रक डॉ. जी. जे. नवाथे, डॉ. श्रुती जोशी, डॉ. कैलास पाटील, प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एम. आर. नवले उपस्थित होते.